अतिवृष्टी, पुर किंवा दरड कोसळल्यामुळे बेघर झालेल्या नागरिकांसाठी तात्पुरते निवारे बांधणेबाबत

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
कमांक : सीएलएस ०७-०५/प्र.क्र.१९२(निवारे)/म-३
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १९ ऑगस्ट, २००५.

**प्रस्तावना:**

दिनांक २५ जुलै, २००५ रोजी व तद्नंतर बृहन्मुंबईसह कोकण, पुणे या महसूली विभागातील आणि मराठवाडा महसूली विभागातील नांदेड, परभणी या जिल्ह्यात अभूतपूर्व झालेली अतिवृष्टी व पुरामुळे मोठ्या प्रमाणावर जिवित व वित्तीय हानी झालेली आहे. विविध घटक व उपघटकांच्या झालेल्या नुकसानीत मोठ्या संख्येने झालेल्या घरांच्या नुकसानीचासुध्दा प्रामुख्याने समावेश आहे. नुकसानीच्या निर्धारणाचे काम अजून प्रगतीपथावर असून प्राथमिक अंदाजानुसार राज्यात सुमारे ४.३५ लाख घरांची पडझड झालेली असून दरडी कोसळल्यामुळे, पुराने वाहून गेल्यामुळे व संततधारेमुळे सुमारे १५००० घरांचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून अशी घरे रहिवाशांना राहण्यासाठी सुरक्षित नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. काही गावांचे स्थलांतर नवीन जागेवर सुरक्षित ठिकाणी त्यामुळे करावे लागणार आहे. सध्या संक्रमण शिबीरात व अन्य सार्वजनिक इमारतीत आपद्ग्रस्तांसाठी असलेली तात्पुरती व्यवस्था अधिककाळ चालू ठेवणे अडचणीचे आहे. नवीन स्थलांतरीत जागेवर कायमस्वरुपी पुनर्वसनाचे काम पूर्ण करण्यास निश्चितच काही कालावधी लागेल. दरम्यानच्या कालावधील अशा आपद्ग्रस्तांच्या निवा-याची सोय शासनाने करणे आवश्यक झालेले आहे. त्यासाठी साकल्याने विचार करुन तात्पुरते निवारे उभारण्यासाठी शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :

**शासन निर्णय:-**

अतिवृष्टी व पुरामुळे किंवा दरड कोसळल्यामुळे बेघर झालेल्या किंवा मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्यामुळे असुरक्षित ठरलेल्या घरातील कुटुंबियांना किंवा नवीन जागेवर स्थलांतरीत करावयाच्या गावातील स्वतःचे घर असलेल्या घरमालकांना व त्यांच्या कुटुंबियाना तात्पुरते निवारे देण्यासाठी पात्र समजण्यात यावे.

२. तात्पुरते निवारे उभारण्यासाठी जागा निवडणे / निश्चित करणे याबाबतची कार्यवाही मा. पालकमंत्री यांचेशी सल्लामसलत करुन जिल्हाधिकारी यांनी करावयाची आहे.

३. एका कुटुंबासाठी तात्पुरते निवा-याचे क्षेत्रफळ १५० चौ.फूट असावे. प्रत्येक तात्पुरत्या निवा-यासाठी (युनिट) खर्च रुपये १५००० पर्यंत सिमित राहील.

४. तात्पुरते निवा-याचे specification सामान्यतः खालीलप्रमाणे असावे :

| | | |
|---|---|---|
| चटईक्षेत्र | - | १५० चौ.फूट |
| छत (roof) | - | जी.आय.शीटस् चे असावे. |
| फ्लोरींग | - | मुरुमाचा वापर करावा. धम्मस करण्यात यावे. |
| भिंती | - | स्थानिक स्थितीनुसार काही उंचीपर्यंत जी.आय.शीटस, प्लॅस्टीक शीटस चा वापर / बांबू चटईचा वापर |
| फ्रेम स्टक्चर | - | फ्रेम स्ट्क्चरसाठी लाकडी बल्ली किंवा जंगली लाकूडचा वापर व्हावा. |
| दरवाजा व खिडक्या | - | जी.आय.शीटस् |
| | - | निवा-यामध्ये लहानशा मोरीची व्यवस्था असावी. |

५. तात्पुरते निवारे उभारण्याच्या कामात स्थानिक साहीत्य जसे बांबू, चटई, जंगल लाकूड याचा वापर करण्यास प्राधान्य द्यावे.

६. जिल्हाधिकारी यांनी त्यांचे स्तरावर एकूण किती निवारे उभारावयाचे आहेत याची गावनिहाय यादी तयार करुन संख्या निश्चित करावी.

७. निवारे उभारण्याच्या कामाची तातडीची गरज लक्षात घेता लाभधारक घरमालकास रुपये १५,०००/- च्या मर्यादेत निवारा उभारण्याच्या कामाकरीता प्रवृत्त करावे व देय अर्थसहाय्य दोन हप्त्यात वाटप करावे. पहिला हप्ता रु ५,०००/- रकमेचा असावा त्याचा विनियोग झाल्यावर, दुस-या हप्त्याची रक्कम रु १०,०००/- प्रदान करण्यात यावी दोन्ही हप्त्याचे प्रदान रोखीने करण्यात यावे.

८ वरील (७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रतिसाद न मिळाल्यास निवारे उभारण्याचे काम अत्यल्प मुदतीची निविदा सूचना (३ दिवस) देऊन कामाचे कंत्राट निश्चित करुन, कंत्राटदारांमार्फत करुन घ्यावे किंवा जिल्ह्यातील सक्षम व उत्सुक सेवाभावी संस्थांकडून कामे करुन घेण्यात यावी किंवा अशा कामासाठी काही पुरवठादार / कंत्राटदारांकडे स्वत:चे तयार साहीत्य असते, त्यांच्याकडून टर्न की बेसिसवर काम करुन घ्यावे. जिल्हाधिकारी यांनी स्थानिक स्थितीनिरुप निर्णय घ्यावे.

९ वरील बाबीवर होणारा खर्च खालील लेखाशीर्षाखाली नोंदविण्यात यावा व जिल्हाधिकारी यांचे अधिनस्त ठेवण्यात आलेल्या अनुदानातून खर्च त्यांनी भागवावा.

मागणी क सी-६

| | | |
|---|---|---|
| २२४५ | - | नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य |
| ०२ | - | पूर, चक्रीवादळ इत्यादी |
| १०१ | - | अनुग्रह सहाय्य |
| ४१ | - | सहाय्यक अनुदाने |
| १०१(०४)(०५) | | इतर बाबी (२२४५०२४४) |

१०. प्रामुख्याने ठाणे, रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर, सांगली, सातारा, नांदेड, यवतमाळ या जिल्ह्यात तात्पुरते निवारे उभारणीचे काम जिल्हाधिकारी यांना तातडीने हाती घ्यावे लागणार आहे. या जिल्ह्यांव्यतिरीक्त अन्य जिल्ह्यात तात्पुरते निवारे उभे करण्याची मागणी आल्यास त्यावर मा. पालकमंत्री यांचेशी सल्लामसलत करुन निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिका-यांना असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्रकाश गोसावी)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद
सर्व महानगरपालिका, आयुक्त

---